पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc-pcpc@mah.gov.in



जा.क्र./पोउआ/वाह/रि. साय./६००७९१२/२०२६ पिंपरी चिंचवड दिनांक - २६/११/२०२६

☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

दिनांक २९/११/२०२६ रोजी अविरत श्रामदान,सायकल मित्र, महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पी.एम.आर.डी.ए यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रायणी नदी सर्वधन व स्वच्छता आणि पाणी बचत या विषय जनजागृती करण्यासाठी **'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन-२०२६'** चे आयोजन केले आहे. सदर सायक्लोथॉन मध्ये मोठ्या प्रमाणात जनसमुदाय सहभागी होणार आहे. त्यामुळे नमुद मार्गावर वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर सायक्लोथॉन मार्गाकडे येणारी वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी विक्रांत देशमुख, पोलीस उपायुक्त, वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करीत आहे.

चिखली वाहतूक विभाग

दिनांक व वेळ	बंद करण्यात येणारा मार्ग	पर्यायी मार्ग
२९/११/२०२६ रोजी पहाटे ०३/०० ते सकाळी १२/०० वा. पर्यंत	१.पुणे नाशिक हायवे वरील बोऱ्हाडेवाडी चौक येथुन गोल्ड जिम चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	सदर मार्गावरील वाहने भारत माता चौकातुन देहु आळंदी रोडने इच्छीत स्थळी जाईल.
	२.गोल्ड जिम चौक येथुन बोऱ्हाडेवाडी चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	सदर मार्गावरील वाहने शिवरोडने जावुन देहु-आळंदी रोडने इच्छीत स्थळी जाईल.
	३.संतनगर चौक येथुन स्पाईन सिटी मॉल येथे येण्यास सर्व वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	सदर मार्गावरील वाहने संतनगर चौक येथुन डाव्या बाजुला वळुन वैष्णव माता मार्ग वरुन टेल्का रोडने इच्छीत स्थळी जाईल.
	४.पुणे नाशिक हायवे वरील आप्पा पाटील चौक (आरटीओ लिंक रोड) येथुन आरटीओ ऑफिस येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	सदर मार्गावरील वाहने भारतमाता चौकातुन देहु आळंदी रोडने इच्छीत स्थळी जाईल.
	५.सरदार चौक येथुन मातेरे हाऊस चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	सदर मार्गावरील वाहने इंद्रायणीनगर कॉर्नर मार्गे टेल्को रोडने इच्छीत स्थळी जाईल.
	६.संतनगर येथुन आरटीओ ऑफिस येथे येण्यास सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे	सदर मार्गावरील सर्व वाहतुक ही पांजरपोळ चौकातुन किंवा संतनगर चौक येथुन वैष्णव माता मार्ग वरुन टेल्को रोडने इच्छीत स्थळी जाईल.
	७.जाधववाडी येथुन जाधव सरकार चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	जाधववाडी येथुन देहु आळंदी रोडने इच्छीत स्थळी जातील

Scanned with OKEN Scanner

२९/११/२०२६ रोजी पहाटे ०३/०० ते सकाळी १२/०० वा. पर्यंत	८.नेवाळे वस्ती येथुन चेरी चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे	नेवाळे वस्ती येथुन देहु आळंदी रस्त्याने इच्छीत स्थळी जातील
	९.पुर्णानगर येथुन चेरी चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे	बर्ड व्हॅली चौक येथुन टेल्को रोडने इच्छीत स्थळी जातील.
	१०.साने चौक येथुन कृष्णानगर चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	सदर मार्गावरील वाहने देहु आळंदी रोडने इच्छीत स्थळी जातील
	११.थरमॅक्स चौक येथुन कृष्णानगर भाजी मंडई चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	थरमॅक्स चौक येथुन टेल्को रोडने इच्छीत स्थळी जातील.
	१२.मोरे वस्ती येथुन संविधान चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	मोरे वस्ती येथुन टॉवर लाईन मार्गे देहु आळंदी रोडने इच्छीत स्थळी जातील
	१३.कृष्णानगर येथुन संविधान चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	कृष्णानगर येथुन थरमॅक्स चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील
	१४. टॉवर लाईनचौक येथुन त्रिवेणीनगर चौक येथे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	टॉवर लाईन येथुन गणेशनगर मार्गे देहु आळंदी रोडने इच्छीत स्थळी जातील
	१५.दुर्गानगर चौक येथुन त्रिवेणीनगर चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.	दुर्गानगर चौक टेल्कोरोड थरमॅक्स चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील

वरील नमुद मार्गावर दिनांक २९/११/२०२६ रोजी पहाटे ०३/०० वा पासुन सकाळी १२/०० वाजे दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहतुकीस (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) आवश्यकते नुसार मनाई करणेकरीता अधिसुचना (नोटिफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

तरी वाहन चालकांनी/नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(विक्रांत देशमुख)
पोलीस उपायुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड शहर

२) मा. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

३) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४)प्रभारी अधिकारी चिखली, निगडी, वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड
/- वाहतुक बदलाचे अनुषंगाने योग्य ते बॅरीगेटींग लावून बंदोबस्त नेमावा.

Scanned with OKEN Scanner